वृत्तपत्राचे नांव :– तरुण भारत

वृत्तपत्र प्रकाशनाचे ठिकाण :– नागपूर

वृत्तपत्र पान क्र :– 5

दिनांक :–25/08/2005

# वेद वाङ्मय वाचस्पती : वेदमूर्ती श्री. बाबूराव धामनकर

सुधाकर देशपांडे

२५ ऑगस्ट २००५. वेदमूर्ती श्री बाबूराव धामनकरांचा हा पहिला स्मृतिदिन. वर्षापूर्वी याच दिवशी वेदमूर्ती ब्रह्मलीन झालेत. उभा महाराष्ट्र एका प्रकांड पांडित्याला व निष्ठावान वेदवाङ्मयोपासकाला मुकला. नागपूरस्थ वैदिकांचा मार्गदर्शक हरपला.



लाडाचं कारंजं हे श्री महालक्ष्मीचं स्थिरस्वरूपी वास्तव्य लाभलेलं गाव. त्या गावाने शारदेचंही तसंच स्वागत केलं. परिणामी अनेकानेक शारदोपासक घराणी या गावात उदयास आलीत, स्थिरावलीत. दत्तावतार श्री नृसिंह सरस्वतीचं मूळ जन्मगाव ते हेच कारंजं. दत्तसंप्रदायाचं एक पावन 'तीर्थक्षेत्र' म्हणून नावलौकिकास आलं. तसंच जैन पंथीयांचं 'सिद्धक्षेत्र' म्हणूनही कारंजं प्रसिद्ध आहे.

याच काळात म्हणजे जवळपास ३५० वर्षांपूर्वी वेदोपासक धामनकर घराणं या गावात उदयास आलं. या घराण्याच्या श्री जयराम भट्टांनी चतुरंग घनापाठी वैदिक असा लौकिक संपादिलेला होता. श्री पुरुषोत्तम भट हें त्यांचेच चिरंजीव. तेही मोठे वैदिक, घनापाठी म्हणून प्रसिद्धी पावलेत. त्यांचा नावलौकिक ऐकूनच नागपूरकर भोसल्यांनी त्यांना राजाश्रय देऊन नागपुरी स्थायिक केलं. लक्ष्मणभट त्यांचे पुत्र. लक्ष्मणभटांचे पुत्र नारायणशास्त्री उपाख्य नानाजीशास्त्री धामनकर. त्यांनी मुलाचं नामकरण 'सदाशिव' असं केलं. श्री सदाशिवशास्त्री धामनकर म्हणजेच उभ्या महाराष्ट्रालाच नव्हे, तर बृहन्महाराष्ट्राला परिचित असलेले वेदमूर्ती श्री बाबूराव धामनकर.

नागपूरकर भोसल्यांच्या राजाश्रयानेच धामनकर घराणं नागपूरला स्थायिक झालेलं. साहजिकच भोसला वेदशास्त्र महाविद्यालयातूनच श्री बाबूरावांच्या वेदविद्याध्ययनाला आरंभ झाला. येथेच त्यांना घनापाठी याज्ञिक श्री नानाजीशास्त्री अग्निहोत्री यांचे मार्गदर्शन मिळाले. शुक्लयजुर्वेदान्तर्गत संहिता तसेच पद- जटा- क्रम- घन आदी विकृतीसह त्यांनी अभ्यास पूर्ण केला. पिताश्री श्री नानाजीशास्त्री यांचे जवळ त्यांनी शतपथ ब्राह्मणांचे अध्ययन केले. येथील शिक्षण पूर्ण करून त्यांनी काशी गाठली. तेथील हिंदू विश्वविद्यालयातील न्यायाचार्य, मीमांसाचार्य श्री रामशास्त्री खणंग यांच्याजवळ श्री बाबूरावांनी यज्ञमीमांसा, कात्यायन सूत्रादिचं अध्ययन पूर्ण केलं. नागपुरातील प्रसिद्ध वैय्याकरणी श्री वासुदेवशास्त्री घाटे यांचेकडे त्यांनी व्याकरणशास्त्राचा अभ्यास केला.

पिताश्री श्री नानाजीशास्त्री धामनकराचं नागपूर-विदर्भ परिसरातील नाव मोठं, त्यांचा लौकिक मोठाच. श्री बाबूरावांनी तो लौकिक विस्तारला, त्याला अधिक उंची प्रदान केली. विदर्भ-महाराष्ट्राची सीमा ओलांडून धामनकर घराण्याचा नावलौकिक बृहन्महाराष्ट्रातही गाजत-गर्जत ठेवला. मुंबई- पुणे- नाशिक- इंदूर आदी ठिकाणी झालेले त्यांचे सत्कार सोहळे, मिळालेले मानसन्मान ही त्याचीच बोलकी साक्ष ठरतात. वैदिक उत्सव महोत्सवात देवप्रतिष्ठा, सहस्रचंडी, अतिरुद्रादि यज्ञयाग- त्यांची उपस्थिती 'अध्वर्यु ', 'ब्रह्मा' या महनीय भूमिकेचीच असायची.

नागपूरच्या वैदिक विश्वात त्यांचं स्थान अन्य न असंच. नागपूरस्थ वेदोपासकांत ते अभिमानच होते. मग विविध स्थळीच्या मानसन्मानाचे तुरे आपल्या मंदिलामाजी मिरवणाऱ्या वेदमूर्तीच्या सत्कार सोहळ्यात नागपूर मागे कसं असणार. ते तर नागपूरची वैदिक अस्मिताच. जगद्गुरू शंकराचार्य, स्वामी शिवकुमार यांच्या हस्ते अनेकानेक मान्यवरांच्या उपस्थितीत प्रज्ञाभारती श्री. भा. वर्णेकर, कुलगुरू श्री. पंकज चांदे, विहिंप अध्यक्ष श्री. अशोकजी सिंघल- त्यांचे विविध सत्कार नागपूरकरांनी मोठ्या उत्साहानं भव्य प्रमाणात साजरे केलेत.

विविध मानसन्मान, अनेकानेक गौरवसमारंभांचे वेदमूर्ती श्री बाबूराव मानकरी ठरलेत. ते अर्थातच त्यांच्या वेदोपासनेचं पारितोषिक खरंच. परंतु त्यांनी तशी अपेक्षा, आकांक्षा कधीच बाळगली नव्हती. वेदोपासना ही त्यांची तपस्या होती, ते त्यांचं व्रत होतं. स्वेच्छेनं स्वीकारलेल्या व्रतावर त्यांची अव्यभिचारी निष्ठा होती, ती अक्षय राहिली. 'सदाशिव' हे त्यांचं नाव. ते त्यांनी आपल्या सदा 'शिव' शांत- सात्त्विक- सोज्वळ वर्तनव्यवहारानं अगदी सार्थ केलं. वयाच्या ९० व्या वर्षी आपल्या कृतकृत्य जीवनाची त्यांनी अगदी 'धन्योऽहं' च्या भावनेनं सांगता साधली.

■ १०१, धूम्रवर्ण निवास
शारदानगर, नांदेड